# वेद आणि संत

"वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा।
आणिकें वहावा भार माथा॥

अशा परखड पण पंडितांना झोंबणाऱ्या शब्दांत श्री.संत तुकोबारायांनी आत्मविश्वासपूर्वक ग्वाही दिली आहे. वेदांचा पसारा फार मोठा असल्याने व त्याचा आवाका सर्वसामान्याला म्हणजेच बहुतेक सर्वांना पेलणारा नसल्यामुळे संतांचा मागोवा घेणे हा एकच मार्ग वेद जाणण्यासाठी उरतो.

वेद निर्माण झाले तेव्हा ते इतके अस्ताव्यस्त होते की, भल्याभल्यांना त्यांच्या अंतपार लागत नव्हता व त्यांतून नेमके कोणी काय घ्यावयाचे हे कळत नव्हते. भगवान व्यासांनी त्यांचे चार भागांत वर्गीकरण करून त्यांची फेरमांडणी करून त्यांना काहीसे आवाक्यात आणले. ब्राह्मणामध्येही काही गट तयार करून एका एका वेदाचे रक्षण करण्याचे कार्य एका एका गटाकडे दिले. या गटांनी हजारो वर्षे आपापला वेद मुखोद्गत करून त्याचा सांभाळ केला. आज अशांची संख्या अतिशय थोडी असली तरी मुद्रणकलेमुळे ग्रंथरूपाने आजही वेद अस्तित्वात आहेत. वेदमंत्रांची संथा घेऊन केलेला उच्चार व वेदांचे 'वाचन' ह्यात परिणामाच्या दृष्टीने फार फरक पडतो. वेदांची मंत्रशक्ती त्यांच्या परंपरागत उच्चारावर व तो उच्चार करणाऱ्या पाठकाच्या पवित्रतेवर अवलंबून असते. चालू परिस्थितीतील माणसांच्या क्षमतेचा व योग्यतेचा विचार केला तर संतांनी जेवढा वेदार्थ त्यांच्यासाठी उघड करून स्पष्ट केला आहे त्याचे अनुकरण करण्याखेरीज दुसरा मार्ग आहे काय? संत नाथमहाराज म्हणतात,"वेद अर्थत्वे अति दुर्घट" वेदांचा अर्थ करणे अत्यंत बिकट आहे. एवढेच नव्हे तर वेदांचा अर्थ परमेश्वराने जाणूनबुजून कठीण करून ठेवला आहे! कोणतीही गोष्ट कठीण करून ठेवण्यात सामान्य मानवाचा स्वत:चे महत्त्व वाढविण्याचा जो स्वार्थी हेतू असतो तो मात्र तेथे नाही.तर

"या वेदाचे निरूपण। प्रगट करितां आपण।
निजस्वार्थी नाडती जन। या लागी म्यां गुप्त केले॥"

वेदांचा गाभा जे ब्रह्म तेथे तत्त्वत: पाप-पुण्य, धर्म-अधर्म, नीती-अनीती, साध्य-साधन, गुरू-शिष्य, सुर-असुर इ. काहीच द्वैत व त्रिपुटी नाही. व्यवहारात अडकलेल्या सामान्य माणसाला हे ब्रह्माचे स्वरूप जर स्पष्ट केले तर त्याच्याकडून त्याच्या हितासाठी असलेले साधनच घडणार नाही. म्हणून ते ब्रह्म अत्यंत गुप्त व दुर्बोध करून ठेवले आहे.ह्याच हेतूने भगवान श्रीकृष्ण बजावतात--

"इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।
ना चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति॥"

तपश्चर्या, भक्ती, गुरु-ईश्वरसेवा न करणाऱ्याला ब्रह्मज्ञान कधीही सांगू नये. परमेश्वरावर श्रद्धा नसणाऱ्याला तर ते मुळीच सांगू नये!

संतांची वेदांवर अतिशय श्रद्धा आहे. प्रसंगी संतांच्या वाङ्मयात वेदांसंबंधी वरवर पाहिले तर विरोधी सूर दिसतो. पण त्या सुराचा संदर्भ व हेतू लक्षात घेऊनच निष्कर्ष काढावयास हवा.

"वेदशास्त्रांचे भांडण। शस्त्रें तोडी ऐसा कोण।
ते निवडेना साधूवीण। कदा कल्पांती॥"
(दा. बो.)

येथे भांडण या शब्दाचा अर्थ वेदवचने एकमेकांविरुद्ध उभी ठाकली आहेत असा नसून त्यांत भासणारा विरोध श्रीगुरूंच्या कृपेने मावळतो हा मुख्यार्थ लक्षात घेणे जरूर आहे. तेच समर्थ सांगतात.

"वेदाज्ञेने न चालती । हरिभक्ती न करिती ।
त्यास यम यातना करिती ।।"

वेदांची, श्रुतिस्मृतीची, धर्माची आज्ञा न पाळल्यावर यमलोकात जावे लागून यातना भोगाव्या लागतात.

'वेदांचे जाण त्रिविध बंड । त्रिकांडीं केला तो त्रिखंड ।
वेदबळे बा पाखंड । वाजवी तोंड अव्हासव्हा ।"
(ए. भा.)

नाथमहाराज येथे वेदांच्या तीन प्रकारच्या बंडाचा उल्लेख करतात. त्याचा अवास्तव माजविलेले स्तोम असा अर्थ होतो. वरवर पाहिले तर ते वेदविरोधक आहेत असा धोपट निष्कर्ष निघू शकेल. पण संदर्भासह विचार केला तर वेदांत केवळ शब्दज्ञान सांगितले असून शब्दज्ञानापेक्षा ते शब्द ज्या ब्रह्माकडे बोट दाखवितात त्याचा अनुभव घेणें फार महत्त्वाचे आहे हे सांगण्याच्या ओघात 'बंड' शब्द आला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तेच नाथमहाराज,

"वेदोक्त आचरावे स्वकर्म। निःशेष त्यागावे निषिद्ध काम्य ।
या नाव शुद्ध स्वधर्म । उत्तमोत्तम अधिकारु ।।"

अशी आज्ञा देतात. श्रीज्ञानेश्वर केवळ सोयीस्कर वेदाज्ञेचा आधार घऊन बोलणारांना कोपरखळी देताना म्हणतात—

'वेदाधारे बोलती । केवळ कर्म प्रतिष्ठिती ।
परी कर्मफळीं आसक्ती । धरूनिया ।।
(ज्ञाने. २–४५)

येथे वेदाधारे बोलणारे दुर्बुद्धीचे असतात असे ज्ञानदेवांना म्हणावयाचे आहे काय ? सकाम कर्म व इंद्रियसुखाची निंदा करण्याच्या भरामध्ये हे विचार आले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. एऱ्हवी ज्ञानेश्वर महाराज—

"वेदीं अन्यायी पडे । तो निरयभोगे दंडे ।
संन्यासी तो सुरवाडे । स्वर्गी जिये ।। १६–२९६।।"

वेदांच्या दृष्टीने जो अन्यायी ठरतो त्याला नरकयातना व त्यांच्या दृष्टीने न्यायी ठरतो त्याला स्वर्गसुख मिळते असे स्पष्ट सांगतात.

"वेदांचे गव्हर न कळे पाठका ।अधिकार लोकां नाहीं येर ।'
(तुकाराम)

वेदांची गुंतागुंत, त्यांचे तात्पर्य वेदपठण करणाऱ्यालाही समजत नाही, मग इतरांना त्याचा अधिकार नाहीच नाही. श्रीजगद्गुरू तुकाराम महाराज येथे वेदांचा त्याग करावयास सांगत नसून तें हल्ली मानवाला त्याच्या दुर्बुद्धीमुळे झेपत नाहीसे झाले आहेत असे सांगत आहेत. उलट त्यांची वेदांवर असीम श्रद्धा आहे. ते म्हणतात—

"वेदशास्त्र नाही पुराण प्रमाण ।
तयाचे वदन नावलोका ।"

वेदांना व पुराणांना जो प्रमाण मानीत नाही त्याचे तोंडसुद्धा पाहू नका !

सर्व वेदांची कर्म, उपासना व ज्ञान अशा तीन भागांत किंवा कांडांत मांडणी केली आहे. स्थूलमानाने यजुर्वेदात कर्म, अथर्ववेदात ज्ञान तर सामवेदात उपासना प्रकर्षाने आहे. शिवाय प्रत्येक वेदाच्या मांडणीतही अशी वर्गवारी आहे. वेदांतील कर्मासंबंधीचा सर्व विचार वर्ण, यज्ञ, विधी, निषेध, नित्य, नैमित्तिक व प्रायश्चित्त कर्म ह्या संकल्पनांवर आधारलेला आहे. वेदकालीन जीवन संथ, स्वस्थ व काहीसे आदर्शवादी होते. आर्य-अनार्य, वैदिक-वेदबाह्य व द्वैत-अद्वैत अशी संघर्षाची ठराविक क्षेत्रे होती. त्या काळी हल्लीच्या जीवनाची व आज तत्कालीन परिस्थितीची कल्पना करणेही कठीण ठरावे इतका बदल झाला आहे. परिस्थितीने जीवनच पूर्ण बदलून टाकल्याने जीवनपद्धती बदलणेही अपरिहार्य झाले. त्या काळी आदर्शवत् असलेली मनुस्मृती आज कालबाह्य झाली असून आता पाराशर-स्मृतीचा कालखंड चालू आहे, व त्याही स्मृतीला वेदांचाच आधार आहे ! वेदांच्या कर्मकांडात स्वाभाविकपणे प्रपंच, राज्य व आरोग्य ह्यांचा बराच विचार झाला आहे. कर्माचरणासाठी ह्या सर्वांची आवश्यकता वादातीत आहे.

"मा नो अग्नेऽमतये मावीरतायै रीरधः
मागो तायै सहसस्पुत्र मा निदेऽप द्वेषास्या कृधि ।।"
(ऋग्वेद ऋ. ३–१६–५)

"हे बलपुत्र अग्ने ! आम्हाला तू दुष्ट शत्रूच्या हातात पडू देऊ नकोस. आम्हास संततिरहित करू

नकोस. आम्हाला (गाय शेळी इ.) पशुहीनही करू नकोस. आमच्यातील द्वेषबुद्धी नष्ट कर." आमचे म्हणजे गटाचे किंवा राज्याचे शत्रू ह्यात राज्य-कल्पना आहे. संततीमध्ये कुटुंबाची, पशूमध्ये चरितार्थाची तर द्वेषामध्ये मनाच्या आरोग्याची कल्पना आहे. संतवाङ्मयात या बाबी फारशा आढळत नसल्या तरी अगदीच उपेक्षित नाहीत. प्रत्यक्ष, आडवळणाने किंवा उदाहरण देण्याच्या ओघामध्ये त्यांचा विचार अवश्य सापडतो.

"आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका।"

—नेटक्या व यशस्वी प्रपंचावर समर्थांइतका कोणीच भर दिलेला नाही. या वेदांगाकडे त्यांच्या इतके कोणीच लक्ष दिले नाही हे एक नवलच आहे. जास्तीत जास्त घटक ज्यामध्ये गुरफटले आहेत तो भाग दुर्लक्षित केला तर त्यांच्या हिताचा विचार तरी कसा होणार? समर्थांच्या शिवस्तुतीत व आनंदवनभुवनात आदर्श राजाची व राज्याची कल्पना स्पष्ट मांडली आहे. संत तुकोबाराय सांगतात

"जोडोनिया धन उत्तम वेव्हारे।
उदास विचारे वेच करी॥"

कोटचवधी लोकांसाठी असणारा हा विचार व आदर्श त्यांच्या भक्तिरसात कोठेच बुडून जातो!

"कुळी कन्यापुत्र होती जी सात्त्विक।
तयाचा हरिख वाटे देवा॥"

येथे तुकोबा कुळाचा व वंशाचा विचार मांडतात पण तोही भक्तीच्या संदर्भात सांगतात. श्रीसंत ज्ञानदेव राजाचा—आदर्श राजाचा—उल्लेख आडवळणानेच करतात. ज्ञानेश्वरीच्या शेवटी त्या ग्रंथाच्या लिखाणाचे स्थळ, काळ, लेखनिक इ. बाबींचा उल्लेख करताना ते म्हणतात—

"येथ यदुवंशविलासु। जो सकळकळा निवासु।
न्यायते पोषी क्षितीषु। श्रीरामचंद्र॥"

सुखाने चालत आलेला राजवंश, सर्व कलांना व कलावंतांना आश्रय देणारा राजा, न्यायाचा पाठपुरावा करणारी सार्वभौम सत्ता या अत्यंत महत्त्वाच्या बाबी केवळ ग्रंथलेखनाचे स्थळ सांगण्यापुरत्या मांडून सोडून दिल्या आहेत. इहलोकातील मानवाचे जीवन चांगल्या रीतीने चालले पाहिजे हे ते मांडतात, पण तेही परलोकाच्या संदर्भात!

"जया ऐहिक धड नाहीं। तयाचे परत्र पुससी काई।"
(ज्ञा. अ. ४)

श्री संत एकनाथ महाराजांनी मात्र भारुडे, भावार्थ रामायण इ. वाङ्मयात सामाजिक जीवनाचा सर्व अंगप्रत्यंगांचा खूपच विचार केला आहे. भावार्थ रामायणाती उत्तरकांडामध्ये एकेचाळिसाव्या अध्यायाचा या दृष्टीने अभ्यास करण्यासारखा आहे.

"यः शश्वतो मह्येनो दधानान
मन्यमानाञ्छर्वी जघानं।
यः शर्धते नानुददाति शुध्यां
यो दस्योईन्ता स जनास इंद्रः॥"
(ऋ. २-१२-१०)

येथे इंद्राचे म्हणजे जागरूक राजसत्तेचे लक्षण स्पष्टपणे सांगितले आहे. जो मोठी पातके करणारांना, राजसत्तेची अवहेलना करणारांना, मस्तवालांना व दस्यू म्हणजे कायदेभंग करणारांना ठार मारतो तो हा इंद्र आहे! मनुस्मृतीमध्ये सुद्धा दंडाशिवाय प्रजेचे शासन होत नाही हे सांगताना दंड हाच अनुशासनाचा खरा आधार असल्याचे म्हटले आहे. तुकोबा 'दया' या शब्दाचे लक्षण करताना म्हणतात—

"दया तिचे नांव भूतांचे पाळण।
आणिक निर्दाळण कंटकांचे।"

दयेच्या संदर्भात निर्दाळण हा शब्द विसंवादी वाटतो पण तोच खरा सुसंवादी आहे हे जानकारांनाच कळते. हा दंड जेव्हा उलट दिशेला फिरू लागतो तेव्हा समाजाची काय स्थिती होते याचा अनुभव आज येतोच आहे.

"देव सवितः प्रसुव यज्ञं प्रसुव यज्ञपतिं भगाय।
दिव्यो गंधर्व केतपूः केतं नः पुनातु।
(यजु. स. ३०-१-१)

"हे सर्वप्रेरक सूर्यदेवा! यजमानांच्या कल्याणासाठी यज्ञाला प्रेरणा दे व उत्तम भाग्य मिळविण्या-

ची यजमानाला प्रेरणा दे. स्वर्गस्थ व शब्दरूप वाणीचा स्वामी व ज्ञानसन्मुख मनाला शुद्ध करणारा सूर्य त्या मनाला शुद्ध करो. आमच्या वाणीचा स्वामी सूर्य आमच्या वाणीत माधुर्य निर्माण करो." वैदिक जीवनपद्धतीत यज्ञाला असाधारण महत्त्व होते. ते जीवनच यज्ञमय होते. "उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म" ह्यात म्हटल्याप्रमाणे भोजन देखील विधिपूर्वक व यज्ञ म्हणून केले जाई. पुंसवन विधीपासून उत्तरक्रियेपर्यंत व नंतर श्राद्धकर्माच्या रूपाने व्यक्तीवर मंत्रसंस्कार विधिपूर्वक करण्यात येत असत. या वैदिक कर्मकांडांतील फार थोडा भाग आता शिल्लक असून परिस्थितीच अशी झपाट्याने पालटत आहे की त्याचे पुनरुज्जीवन अशक्य वाटावे. आधुनिक मंडळींनी त्यांची टर उडवावी किंवा अभिमान्यांनी आधुनिकांचा तिरस्कार करावा ह्यामध्ये परिस्थितीतील महदंतर विचारातच घेतले जात नाही. संत मात्र कालमानाला धरून वैदिक संकल्पनांना नवे वळण देतात.

"नामें स्नानसंध्या केले क्रियाकर्म ।
त्याचा भवश्रम निवारला ।
आणिकें दुरावली करितां खटपट ।
वाडगे बोभाट वर्माविण ॥"

(तुकाराम)

स्नान, संध्या, नानाविध क्रिया व कर्मे एका नामानेच सांग होतात. चालू परिस्थितीत वैदिक कर्माचे वर्म जाणून घेऊन त्यातील पुरोहित, सामुग्री, वेळ ही टाळून परमेश्वराच्या स्मरणाने व त्याच्या नामाच्या उच्चारानेच भवजीवन श्रमरहित व सुखाचे होईल.

"नामजपयज्ञ तो परम । बांधूं न शके स्नानादि कर्मं ।
नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थे ॥

(ज्ञानेश्वरी अ. १०)

नामजपयज्ञ सर्वात श्रेष्ठ असून स्नानादी कर्मावाचून यांचे अडत नाही. नित्यादी कर्मरूप धर्म व ते न केल्याचा अधर्म दोन्ही नामजपयज्ञाने पावन होतात, कारण वेदांनी नामालाच परब्रह्म म्हटले आहे.

"कां मत्पर जो माझा भक्त । तया आश्रम नेम नाही तेथ ।
तो माझिया भजने कृतकृत्य । नित्य जाण उद्धवा ॥"

(नाथ महाराज)

आश्रमाची कल्पना व नित्यनेमाचे बंधन सतत माझ्या चिंतनात असलेल्या माझ्या भक्तांना नाही. ते माझ्या भजनानेच कृतकृत्य होतात. यज्ञ करून वृत्ती जर पालटली नाही तर यज्ञाची मोठी खटपट तरी कशासाठी करावयाची ?

"तीळ जाळिलें तांदूळ । काम क्रोध तैसेचि खळ ।
कां रे शिणलासी वाडगा । न भजता पांडुरंगा ॥"

(तुकाराम)

कामक्रोधादी दुष्ट वृत्ती तशाच राहिल्या तर नाना हविर्द्रव्ये अर्पण करून केलेला यज्ञ म्हणजे फुकट श्रम नव्हेत काय ? त्यापेक्षा पांडुरंगाचे भजन का करीत नाहीस ?

उपासना हा वेदांचा प्राण आहे. कर्म हे त्यांचे शरीर असून आत्मज्ञान हे त्यांचे ध्येय आहे. सविता, उषा व इंद्र हे वेदांच्या उपासनेचे खास विषय असून अग्नी हा प्रत्यक्ष समोरच असल्याने कर्म व उपासना ही दोन्ही त्याच्या साहचर्यात घडत असत.

"न तमहो न दुरितानि मर्त्यं ।
मिन्द्रा वरुणा न तपः कुतश्चन ।
यस्य देवा गच्छयो वीथो अध्वरं ।
न तं मर्तस्य नशते परि-हुति ॥"

(ऋ ७-)

"हे इंद्र, वरुणदेवा ! ज्या उपासकाच्या यज्ञस्थळी तुम्ही प्रवेश करून त्यातील हविरन्नाची इच्छा धरता त्याला कोणतेच पाप लागत नाही. दुराचरणाचा दोष लागत नाही व कशाचाही ताप होत नाही." उपासक उपासना करण्याचा प्रयत्न करीत असतो. ती उपासना जेवढी प्रेममय व तीव्र होईल तितका उपास्य दैवताचा तिला अधिकाधिक प्रतिसाद मिळतो. तो मिळू लागला की त्याचे सर्व जीवनच यज्ञमय होते. अशा जीवनात प्रारब्धामुळे जी कर्मे जशी घडतील तशी दैवतामध्येच लीन होत असल्याने त्या उपासकाला त्यांचा बंध होत नाही.

"आणिकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव ।
तयां मी वांचूनि धांव । आनौती नाही ॥"
(ज्ञाने. ९-७९)

तेवी मी जयां । जैसे असती तैसियां ।
कळिमाळ नोकोनिया घेतला पहा ॥८४॥

वेदांचा इंद्र हे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व आहे. प्रसंगानुसार त्याचा अर्थ बदलत जातो. तो इंद्र कालांतराने मागे पडून राम, कृष्ण, दत्त, शिव, विठ्ठल अशा उपासना पुढे आल्या तरी त्या सर्व देवता 'ब्रह्म' आहेत यात मात्र वदल झाला नाही. संतांनीही ही सर्व दैवते उपासनेसाठी स्वीकारून प्रसारही त्यांचाच केला. वरील ज्ञानदेवांच्या ओव्यांमध्ये 'मी' म्हणजे यांपैकी कोणतेही दैवत असू शकते, देहाला धरून असलेल्या 'मी'च्या सर्व जाणिवा या 'मी'मध्ये लीन झाल्या की, कर्माचे कर्तृत्व व भोक्तृत्व सुद्धा त्यातच लीन होते हे वर्म हाती आले की उपासना सफल होऊन मोक्ष देते.

आत्मज्ञान हा वेदांचा आत्मा आहे. कर्म व उपासना आत्मज्ञानाची पूर्वतयारी करून देतात. केवळ कर्मांमध्ये रमणारांची वेदांमध्येच निर्भर्त्सना केली आहे.

"इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं । नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः ।
नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति।"
(अथर्व)

इष्ट व पूर्त (श्रौत व स्मार्त) ही कर्मेच सर्वश्रेष्ठ आहेत असे समजणारे ते महामूर्ख इतर कशालाच कल्याणकारक समजत नाहीत. उच्च स्वर्गलोकांत ते आपल्या फळाचा आस्वाद घेऊन परत मनुष्य किंवा इतर क्षुद्र योनींतही जन्माला येतात—येथे कर्माला विरोध नसून स्वर्गासारख्या क्षुल्लक कर्म-फळाला विरोध आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आश्रमानुसार कर्माचे व जीवनाचे स्वरूप बदलून आत्मज्ञानाकडे झेप घ्यावी ह्याचा येथे आग्रह आहे. तुकाराम महाराज कर्मात रमलेल्या प्रापंचिकांना आपण स्वतः कोणते कर्म केले ते रूपकाने सांगताना म्हणतात—

"एक वेळ प्रायश्चित्त । केले चित्त मुंडण ॥
अहंकारा नांवे दोष । त्याचे वोस पाडिले ॥
अनुतापे स्नानविधी । यज्ञ सिद्धी देहहोम ॥
जीवशिवा होता चुका । तेथे विनटला तुका ॥"

मुंडण, प्रायश्चित्त, स्नान, यज्ञ, होम हे सर्व कर्माला धरून असलेले विधी रूपकाच्या स्वरूपात मांडून कोणते कर्म आपण केले व त्याचे काय फळ मिळाले हे मोठ्या खुबीने सांगत आहेत. मी कामक्रोधादी विकार नाहीसे करून मनाचे मुंडण केले व इतके दिवस संसारात रमल्याचे पाप घडल्याबद्दल प्राय-श्चित्त घेतले. अहंकार नावाच्या मुख्य दोषाला ओस पाडले. त्याला कर्तृत्व-भोक्तृत्वहीन करून टाकले. पश्चात्तापाच्या तीर्थात स्नानविधी आटोपला व ज्ञानयज्ञाची तयारी करून त्यात तीन देहांचे हवन केले. जीव-शिवांत जे अंतर पडले होते ते नाहीसे करून जीव-शिवाच्या ऐक्याने मी शोभू लागलो. जीवशिवाचे ऐक्य म्हणजे आत्मज्ञान झाले तरच जीवनाला शोभा आहे. अन्यथा ते कळाहीन जीवन जगायचे तरी कशासाठी ? उपासनासुद्धा योग्य दैवताची व ते दैवत शिवस्वरूप असल्याचा ज्ञान-मय निश्चय करूनच होणे अत्यावश्यक आहे.

"अन्धं तमः प्रविशन्ति येऽसंभूतिमुपासते ।
ततो भूय इव ते तमो येऽसंभूत्यां रतः ॥"
(यजुर्वेद)

विनाश अटळ असणाऱ्या दैवतांची उपासना कर-णारा साधक अंधारात म्हणजे अज्ञानात गुरफटतो व बाह्य पूजेत रमून त्या बाह्य उपासनेचा अभि-मान धरणारा साधक तर आणखीच खोल अज्ञानात शिरतो ! पितर व देवांची उपासना 'पुत्रं देहि धनं देहि' अशी अपेक्षायुक्त असते. पुत्रधनादी जगत शेवटी अव्यक्त तत्त्वात लीन होऊन राहणारे असल्याने त्यांच्या अपेक्षेने केलेली उपासना त्या अविद्यामय अव्यक्त तत्त्वाचीच केल्यासारखी असते. देवतांच्या मूर्तीची किंवा प्राणाची केलेली उपासना जर अखेरपर्यंत अहंकाररूप वेगळेपणा कायम सांभाळून केली तर ती अधिकच जड तत्त्वाची झाल्याने उपासक आणखीच घट्ट असलेल्या अविद्ये-

च्या पाशात सापडतो. म्हणून 'शिवो भूत्वा शिवं यजेत्' अशा उपासनेलाच खरी उपासना म्हणता येते. जगद्गुरू तुकोबाराय म्हणतात

"केला मातीचा पशुपति । परी मातीसी काय महति ।
शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमाजी सामावे ॥"

मातीचा पशुपती हे केवळ निमित्त आहे. त्यामुळे अविनाशी, अविकारी शिवतत्त्वाशी भावनेने जवळीक साधून शेवटी त्यात मिळून जावयाचे असते ही भावना दृढ नसेल तर मूर्तीशीच सर्व व्यवहार होऊन प्रसंगी मोठीच पंचाईत होते. श्री ज्ञानदेव म्हणतात—

"तैसे ज्ञान जै सांडूनि जाये ।
तै ऐसी हे दशा आहे ।
म्हणोनि कीजे ते केले नोहे । ज्ञानेंवीण ॥"
(९–३०५)

ज्ञान नसेल तर कितीही उपासना केली तर ती न केल्यातच जमा होऊन—

"जवं एक आकारू पुढा देखती ।
तव हा देव येणे भावे भजती ।
मग तोचि बिघडलिया टाकिती ।
नाही म्हणोनी ॥"

अशी फजिती होते. मूर्तीचा आकार ठीक आहे तोपर्यंत त्यात देव आहे. तो आकार बिघडला की देवही बिघडला असे वाटून विषाद, भय व निराशाही वाटते ! म्हणून—

"सर्वे वेदा यत्पदमामनन्ति । तपांसि सर्वाणि च यद् वदन्ति,
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति ।" यजु. (कठ.)

—सर्व वेद ज्या पदाचे वारंवार प्रतिपादन करतात, सर्व तपे ज्या उद्देशाने केली जातात व ब्रह्मचर्यादी व्रते ज्यासाठी आचरली जातात ते प्रणवरूपब्रह्म अनुभवाने जाणून घेणे हेच वेदांचे व जीवनाचे ध्येय आहे. श्री संत ज्ञानदेव म्हणतात—

"चहू वेदी जाण, साही शास्त्री प्रमाण
अठराही पुराणे हरिसी गाती"

तुकोबा सांगतात

"वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ।
विठोबासी शरण जावे । निजनिष्ठे नाम गावे ॥"

हरि किंवा विठोबा याचेच सर्व वेद प्रतिपादन करतात. कर्म व उपासना वेदांत सांगितली असली तरी त्याचा हेतू मात्र आत्मज्ञानाची पूर्वतयारी करून देणे हाच आहे. तो आत्मा तर सदा सर्वदा सर्वांच्या अतिशय जवळ आहे.

'सदा व इंद्रश्चर्कृषदा उपो नु स सपर्यंन ।"
(साम २/१९६)

हा इंद्र सदा तुमच्याजवळ आहे.तो सुपूजित होऊन यज्ञासाठी सतत आकृष्ट असतो.समर्थ सांगतात

"सदा स'दा देव संनीध आहे ।
कृपाळूपणें अल्प-धारिष्ट पाहे ।"

आत्मदेव किंवा इंद्र हेच आमचे स्वरूप असून गुरुकृपेने त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो.

"शौनको ह वै महाशालोऽङ्गिरसं
विधिवदुपसन्नः प्रपच्छ ॥ (मुंडक १–३)

शौनकाने पूर्वपरंपरेनुसार यथाविधि श्रीगुरूंना शरण जाऊन आत्मज्ञानासंबंधी प्रश्न विचारला. गुरुकृपेचे महत्त्व वेदांपेक्षा कितीतरी पटीने, व श्रद्धेने संतांनी गायिले आहे.

"इया गुरुचरण सेवा । हो पात्र तया देवा ।
जे सकळार्थ मेळावा । पाटू बाध ॥ (ज्ञा. १५.९)

या गुरुचरणांच्या सेवेने साधकाला असे दैव प्राप्त होते की त्याला धर्म, अर्थ, काम व मोक्ष किंवा शब्द व सिद्धान्ताच्या मेळाव्यात स्वामित्वाचे सिंहासन मिळते.

"फोडूनी शब्दाचे अंतर । वस्तु दाखवीं निजसार ।
तोचि सद्गुरू माहेर । अनाथांचे ॥" (समर्थ)

ब्रह्म, आत्मा, जीव, प्राण इ. शब्दांचा अर्थ स्पष्ट करून स्वतःचे स्वरूप असलेल्या वस्तूचे म्हणजे आत्म्याचे ज्ञान प्रत्यक्ष करून देतात ते सद्गुरू अनाथांचे माहेर आहेत. काही थोड्याच विद्वान भाग्यवंतांना वेदोपनिषदांचे चिंतन करून जीवनाचे सार्थक करून घेता येते. पण हे भाग्य नसणारे संतांना अनुसरून जीवन सफल होण्याचे भाग्य अनुभवू शकतात व परिणामी त्यांच्याच पंगतीला बसू शकतात हे नक्की !